Vol 2 Issue 12 Sept 2013

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

*Review Of Research*
Vol. 2, Issue. 12, Sept. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

ORIGINAL ARTICLE

# *शिवस्नुषा येसूबाईंचे कार्य आणि कर्तृत्व*

*अनिल माणिकराव बैसाणे*

धुळे

***सार :***

मराठा राजघराण्यातील स्त्रिया ह्या सुसंस्कृत आणि सुविद्य होत्या. घरातील कर्त्या पुरूषांचा सहवास आणि प्रभावातून स्त्रियांवर प्रशासन आणि लष्करी संस्कार होत होते. मालोजीराजे भोसले यांच्या राणीसाहेब उमाबाई ह्या निंबाळकर घराण्याचा वारसा सांगणाऱ्या असून शहाजी व शरिफजी या मुलांवर संस्कार करून राजकारणीयुक्त बनविले होते. लखुजीराव जाधव यांची कन्या जिजाबाई ह्या शहाजीराजांशी विवाह करून भोसले घराण्यात आल्यात. याचबरोबर मराठ्यांच्या राजकारण आणि समाजकारणाला सम्यक् वळण मिळाले. त्यांच्याच संस्कारात शिवरायांची जडण–घडण होवून पतीच्या जहागीरीचे स्वराज्यात रूपांतर करण्याची किमया त्यांनी साध्य केली. शिवरायांच्या राज्यकारभारामध्ये राजप्रतिनिधी म्हणून जिजाऊ साहेबांचे योगदान महत्त्वपूर्ण राहीले आहे. शिवाजी महाराजांच्या थोरल्या राणीसाहेब सईबाई यांना अकाली मृत्यूमुळे आपली कर्तबगारी सिद्ध करता आली नाही.

### *प्रस्तावना :*

पुढे मात्र पिलाजी शिर्के यांची कन्या येसूबाई हिचा संभाजीराजांच्या राणी म्हणून भोसले घराण्यात प्रवेश झाला आणि भोसले घराण्यातील स्त्री कर्तृत्वाला एक महत्त्वपूर्ण आयाम त्यांनी प्राप्त करून दिला.

### *कुशल व धोरणी येसूबाई :*

येसूबाईंच्या भोसले घराण्यात येण्यानेच श्रृंगारपूर व संगमेश्वर परिसरातील रघुनाथ पंडित, मोरेश्वर पंडित व केशव पंडित यांचा शिवरायांच्या दरबारात शिरकाव झाला. या पंडितांच्या पांडित्याबरोबरच संभाजी राजांच्या पराक्रमाचा आणि कुशल राजकारणाचा प्रभाव येसूबाईवर पडला होता.[1] शिवरायांनी तर आपल्या सूनेची गृह आणि व्यवहारशिक्षणाविषयी फारच काळजी घेतली होती. म्हणूनच पुढे संभाजी राजांच्या काळात येसूबाई ह्यांनीच जातीने कारभार पाहून संभाजीराजे यांची 'राजाज्ञा' म्हणून हुकूम देत होत्या.

येसूबाई पत्र लिहितांना त्यावर 'अज रख्तखने सौ येसुबाई' असे म्हणत. तर पत्रावर 'श्रीसखी राज्ञी जयति' असा शिक्काही उमटवीत असत.[2] संभाजी महाराज मोहिमांवर असतांना सर्व कारभारावर जातीने येसूबाईला लक्ष द्यावे लागत असे. येसूबाई कुशल आणि धोरणी राजकारणी बरोबरच कुटूंब वत्सलही होत्या. म्हणून राजाराम महाराज आणि ताराबाई यांच्यापुढे येसूबाई ह्या आदरणीय होत्या.

### *शिर्के घराणे :*

सूर्यवंशीय रामराजाच्या कुळातील अस्सल क्षत्रिय असे शिर्के घराणे होते. त्यांना यजुर्वेदाचा अधिकार होता. उत्तरेतून येवून रायगडावर फौज उभारून वास्तव्य केले. या घराण्यातील व्रजपाळ या मूळ पुरूषाने शिरकावली या गावी शिरकाई देवीची स्थापना केली. कूटर आडनावाच्या या घराण्याने शिर्के हे आडनाव धारण केले. कोकणपट्टीवर संकीसरचा (संगमेश्वर) येथे किल्ला सज्ज करून इस्लामी सत्तेविरूद्ध लढा दिला. पुढे मात्र देशावर येवून जावळी येथे स्थिरावले.  मात्र मोऱ्यांनी जावळीवर कब्जा केल्यावर शिर्के शृंगारपूर येथे सुर्व्यांच्या आश्रयी गेलेत. तेथे सुर्व्यांचे कारभारी म्हणून काम पाहिले. सुर्वेंनी आपल्या मुलीशी पिलाजीचा विवाह लावून दिला. एवढेच नव्हेतर विजापूरच्या बादशहाकडून रायरीची देशमुखी मिळवून दिली. पुढे संभाजी महाराजांशी येसूबाईंचा विवाह झाल्यामुळे ही दोन्ही सुविद्य घराणी एकत्र आलीत.[3]

### *कुलमुखत्यार येसूबाई :*

सन 1661 त 65 च्या दरम्यान पिलाजी शिर्के कन्या राजबाईशी संभाजी महाराजांचा विवाह झाला. तिचेच नाव येसूबाई असे ठेवण्यात आले. पुढे तर येसूबाईंचा संभाजी आणि त्यांच्या राजकारणावर मोठा प्रभाव होता. संभाजी महाराजांनी आपल्याविरूद्ध कटकारस्थाने करणाऱ्या बाळाजी आवजी, बल्लाळ व शामजी यांना प्रायश्चित्त देवून ठार केले. तेव्हा येसूबाईंनी चांगलाच समाचार घेतला. एवढेच नव्हे तर अशा पद्धतीने कारकूनांना ठार केले तर पुढे राज्य कसे चालेल ? असा प्रश्नही उपस्थित केला. याचा संभाजीलाही पश्चाताप झाल्याने बाळाजीच्या दोन मुलांना खंडो आणि निळो बल्लाळ यांच्या रक्षणाची जबाबदारी येसूबाईंवर सोपविली. संभाजी महाराजांच्या तापट स्वभावाला आवर घालण्याचे कार्य येसूबाई करीत असत. आपल्या माहेरच्यांशी आणि संभाजी महाराजांचे संबंध चांगले राहण्याकरिता त्या सतत प्रयत्नशील राहील्या. एवढेच नव्हे तर स्वराज्याच्या हिताकरिता शिर्केंचा आतून पाठिंबा त्यांनी मिळविला होता. स्वराज्याकरिता सर्व कारभाऱ्यांचा विश्वास संपादन करून पती संभाजी महाराजांच्या राजकारणात सहभाग देवून राज्यकारभाराची पूर्ववत घडी बसविण्यात त्या खऱ्या अर्थाने यशस्वी झाल्या होत्या. संभाजी महाराजांच्या काळात स्वराज्याच्या मुलकी कारभाराचे कुलमुखत्यारपद येसूबाईंनीच सांभाळले होते. हा कारभार त्यांच्या शिक्क्यानेच चालविला

**Title:** *"शिवस्नुषा येसूबाईंचे कार्य आणि कर्तृत्व "*
**Source:Review of Research [2249-894X]** *अनिल माणिकराव बैसाणे* **yr:2013 vol:2 iss:12**

जात असे.

देवधर्माकडे लक्ष देवून सामान्य जनतेची त्या काळजी घेत असत. सैन्यापासून यात्रेकरूंना कोणताही उपद्रव होणार नाही याची सदैव काळजी घेत.[4]

गृहकलहप्रसंगी नजरकैदेत असलेल्या राजाराम महाराज आणि त्यांच्या बायकांचा प्रेमपूर्वक संगोपन करून राजमाता असल्याचा प्रत्यय आणून दिला.

### *येसूबाईंचे मुत्सद्दी राजकारण :*

संभाजी महाराजांच्या कैदेची बातमी रायगडावर येण्यापूर्वीच गडावर कोणीही कर्ता प्रधान नसतांनाही मोठ्या धीरोदात्तपणे राजाराम महाराजांना मंचकारोहण करून रायगड लढविण्याची सिद्धता केली. स्वतः रायगड लढविण्याचे ठरवून राजाराममहाराजांना सरकारकून आणि सरदार यांना रायगडावरून बाहेर काढून जिंजीस पाठविले. येसूबाईंच्या या धूर्त आणि मुत्सद्दी राजकारणामुळे मोगली सैन्याचे विभाजन होवून दोन आघाड्यांवर लढावे लागले. तसेच महाराष्ट्रातील मोगली लष्कराचा भर ओसरल्याने मोगलांची लष्करी ताकद क्षीण झाली. रायगड लढविणे जास्त दिवस शक्य नसल्याने सर्वनाशापेक्षा खात्रीच्या आश्वासनांवर रायगडासह मोगलांचे स्वाधीन होण्याचे ठरविले.[5]

मुगलबादशहा हा हिंदू द्वेष्टा असल्याने पुढील अनर्थ ओढवून घेण्यापेक्षा झुल्फिकारखानाशी सन्मानाने बोलणी करून व तशी हमी घेवून येसूबाईंनी रायगड व स्वतः शिवाजी (शाहू) सह स्वाधीन होण्याचे ठरविले. म्हणून रायगडावर मसलत केली की, शिवाजी जाणता होईपर्यंत राजाराम महाराजांनी राज्यकारभार पहावा. राजाराम व शिवाजी हे स्वराज्याचे वारस एकाच ठिकाणी राहील्याने ते मुघलांच्या कचाट्यात एकत्र सापडू नयेत असे ठरले. पुढे राजाराम महाराजांनी बळ एकवटल्याने आम्हाला सोडवावे म्हणून पुढे येसूबाई व शिवाजी दरबारी मंडळीसह खानाचे बंदी बनलेत. मोगलांना 22 किल्ल्यांचा ताबा दिला. आपण दिलेल्या गडांना दोन–दोन नावांनी मोजणाऱ्या शिवनितीचा अवलंब येसूबाईंनी केला होता. रायगडावरून बाहेर पडलेल्या राजारामांचा महाराष्ट्रात निभाव लागला नाही तर जिंजीस जावून कारभार सांगावा असा महत्त्वाचा सल्लाही येसूबाईंनीच दिला होता. अशा धूर्त आणि मुत्सद्दी राजकारणाचा अवलंब करून मराठ्यांचा छत्रपती आहे व तो राज्यकारभार चालवित आहे हे येसूबाईंनी स्वतः कैदेत असतांनाही सिद्ध करून दाखविले.[6]

### *मोगली कैदेतील येसूबाईंचा धूर्तपणा :*

कैदेत असतांना भक्ताजी हुजरे व बंकी गायकवाड या संभाजीकालीन विश्वासू सेवकांमार्फत राजारामांशी संपर्क ठेवून होत्या. मोगली छावणीत राजाराम विरोधी वातावरण बनविले होते. कारण आम्हाला आपल्या कचाट्यात सोपवून स्वतः मात्र आपल्या कबिल्यासह सुटका करून घेतली अशी बतावणी करून बादशाही मर्जी संपादन केली होती. वास्तविक औरंगजेब बादशहा कमालीचा अविश्वासू आणि संशयी होता तरीही राजाराम महाराजांना महत्त्वपूर्ण निर्देश देवून स्वराज्याचा गाढा चालविण्याचा हेतू येसूबाईं अतिशय मुत्सद्दीपणे साध्य करीत होत्या. औरंगजेबाला येसूबाईंच्या राजकारणाविषयी कोणताही संशय नव्हे तर उलट संतोष वाटत होता. म्हणूनच त्याने शाहू महाराजांना अक्कलकोट, इंदापूर, सुपे, बारामती व नेवासे ह्या पाच परगण्यांची जहागीरी दिली होती. तसेच एका सोन्याच्या तलवारीसोबतच शिवरायांची तलवारही भेट दिली होती. या परगण्यांचा कारभार अज्ञान शाहू महाराजांच्या आई येसूबाईंनी आपला शिक्का बनवून चालविला होता. यात येसूबाईंना ज्योत्याजी केसरकर व मोरोपंत सबनीस ह्या दोन विश्वासू आणि जाणत्या माणसांची मदत होत होती. बादशहाचे प्रेम, किंमती भेट वस्तु या प्रलोभनांपासून शाहू महाराजांना दूर ठेवून शाहू महाराजांच्या मनात स्वराज्याची लालसा कायम ठेवली.[7]

### *येसूबाईंची सुटका व मृत्यू :*

पुढे औरंगजेबाच्या निधनानंतर त्यांच्या वारसांमध्ये सत्तासंघर्ष निर्माण झाला. म्हणूनच शहाजाद्यांनी आपल्या फौजांबरोबरच येसूबाई व इतरांना उत्तरेत नेले. आपसातील संघर्षाकरिता शाहू महाराजांना मात्र सन 1708 मध्ये दक्षिणेत पाठविले. शाहू महाराजांनी मात्र दिल्ली तख्तांशी निष्ठा कायम ठेवत स्वराज्याचा कारभार चालविला. म्हणूनच पुढे 10 ते 12 वर्षांनी आपल्या मातेला सर्व कुटुंबियांसह सोडविले. सन 1719 मध्ये येसूबाई साहेब साताऱ्यात येवून दाखल झाल्यात.8 पुढे त्यांनी राजकारणात भाग घेतल्याचाही उल्लेख वाचावयास मिळतो. मात्र पुढे थोड्याच दिवसात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्यावर अंत्यविधी माहुली येथील संगमावर करण्यात आला. (कृष्णा–वेण्णा संगम) याचठिकाणी राणी येसूबाईंचे वृंदावन बांधून शाहू महाराज तेथे दर्शनास जात असत. या वृंदावनाच्या पूजेसाठी शाहू महाराजांनी लोक ठेवले होते.[9]

### *सारांश :*

महाराणी येसूबाई संभाजी महाराजांशी विवाहबद्ध झाल्याने शिवाजी महाराजांच्या स्नुषा म्हणून त्यांचा भोसले घराण्यात प्रवेश झाला. शिवाजी महाराजांच्या काळात प्रशिक्षण घेत येसूबाईंनी स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा विकास करून घेतला. येसूबाईंना शिवरायांबरोबरच जिजाबाईंचाही आशिर्वाद व मार्गदर्शन लाभले होते. महाराजांच्या निधनानंतर स्वराज्यावर मोगली संकट आले. तेव्हा धीरोधात्तपणे संकटाला सामोरे गेल्यात. संभाजी महाराजांची कैद आणि हत्या यामुळे हतबल न होता धूर्तपणे नेतृत्व करून राजाराम महाराजांना दक्षिणेत जाण्याचा सल्ला दिला. स्वतः मात्र रायगड लढविण्याचा निर्णय घेतला व पुढे सन्मानाने मोगली कैद पत्करून कैदेतूनही बादशहाला समजू न देता राजाराम महाराजांना निर्देश देवून स्वराज्याचा कारभार सांगितला. स्वतः कैदेत असतांनाही मराठा स्वराज्य जिवंत ठेवण्याची किमया साध्य केली. दिग्विजयी शिवरायांची स्नुषा आणि महापराक्रमी संभाजी महाराजांची महाराणी म्हणून साजेशे राजकारण त्यांनी सिद्ध केले. साधारण 28 वर्षाची मोगली कैद पत्करलेल्या येसूबाईंच्या स्वराज्याकरिताच्या त्यागाला सीमाच नव्हती. पुढे कैदेतून मुक्त होऊन स्वराज्यात हिताचा कारभार शाहू महारांजामार्फत चालविला. त्याच्या या त्यागाची आणि मुत्सद्दी राजकारणाची नोंद घेतल्याशिवाय मराठ्यांचा इतिहास पूर्ण होणार नाही.

### *संदर्भ :*

1.बेंद्रे वा. सी., छत्रपती संभाजी महाराज, पार्श्व पब्लिकेशन्स, कोल्हापूर, 2013, पृ. 701:702.
2.तत्रैव, पृ. 705.
3.मिराशी डॉ. मीना, महाराणी येसूबाई ऐतिहासिक मागोवा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 1999, पृ. 8–9.
4.तत्रैव, पृ. 58–59.
5.आचार्य डॉ. धनंजय, मराठा सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2007, पृ. 218.

6.कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह. (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड पहिला, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळासाठी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, 2006, पृ. 415.
7.मिराशी डॉ. मीना, उपरोक्त, पृ. 67–68.
8.देशपांडे डॉ. प्र. न., मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2001, पृ.233.
9.मिराशी डॉ. मीना, उपरोक्त, पृ. 720.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org